अपर पोलीस महासंचालक व संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे कार्यालय
त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२००७
(०२५३)२३५२१५८, २३५२१६१ director.mpa.nashik@mahapolice.gov.in


क्र. मपोअ/पशा-1/मपोअ वि.ठि.वि.दुरुस्ती/साऊथ होस्टेल/2025/4452 नाशिक दि. 17 JUN 2025

**विषय :-** म.पो.अ., नाशिक येथील साऊथ होस्टेलच्या इमारतीचे डाव्या भागाचे वॉटर प्रुफिंग करणेचे कामासाठी दरपत्रके मागविणेबाबत.

********

**प्रसिध्दी पत्रक :-**

उपरोक्त विषयास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2014/ प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दि. 01 डिसेंबर, 2016 मधील नियम पुस्तीकेतील परिच्छेद 3.2.3 मध्ये नमुद तरतुदीनुसार महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील साऊथ होस्टेलच्या इमारतीचे डाव्या भागाचे वॉटर प्रुफिंग करणेचे कामासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे नमुद केला आहे.

**ई-कोटेशन / निविदा / दरपत्रके सादर करणेबाबतचा तपशिल सन 2025-2026**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | कामाचे नांव | :- | **महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील साऊथ होस्टेलच्या इमारतीचे डाव्या भागाचे वॉटर प्रुफिंग करण** |
| 2. | कामाची मुदत | :- | **15 दिवस** |
| 3. | पुरवठा करण्याचे ठिकाण | :- | **महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक** |
| 4. | कोटेशन/दरपत्रके सादर करण्याचा कालावधी | :- | **कोटेशन/दरपत्रके मागविणे बाबतचे पत्र निर्गमीत केलेच्या दिनांकापासून 07 (सात) दिवस** |
| 5. | कोटेशन/दरपत्रके जमा करण्याची अंतीम तारीख | :- | **दि.25 / 06 / 2025, सायकांळी- 06.15 वाजेपर्यंत** |
| 6. | कोटेशन/दरपत्रके जमा करण्याचे ठिकाण | :- | **आवक-जावक शाखा, प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक** |
| 7. | आवश्यक कामाचा तपशिल | | **साऊथ होस्टेलच्या इमारतीचे डाव्या भागाचे वॉटर प्रुफिंग करणे बाबतच्या कामाचा तपशिल** |

| अ.क्र | प्रमाण | एकक | कामाचा तपशिल |
|---|---|---|---|
| 01 | 66.629 | घन मीटर | विटा बॅट कोबा काढणे, आणि साहित्य उचलणे, लिफ्ट,इ सर्व निर्देशानुसार |
| 2 | 666.298 | चौ. मीटर | i) टेरेससाठी सिमेंट बेस जलरोधक प्रक्रिया करणे ( भारतीय जलरोधक प्रणाली किंवा तत्सम ) ,<br>ii) योग्य उतारात विटा बॅटस लावणे जेणेकरुन पाणी वाहुन जाईल, त्याआधी बेस स्वच्छ करणे.<br>iii) सिमेंट स्लरी तयार करुन मान्याप्राप्त जलरोधक संयुग मिसळुन C.M.1:5 या प्रमाणात विटा बॅटस लावणे<br>iv) अर्ध्या उंचीपर्यंत जलरोधक मिश्रण भरुन, 3 दिवस शिंपुन ठेवणे. त्यावर C.M. 1:5 या मिश्रणाची स्लरी लावणे,<br>v) शेवटी त्यावर ज्युट फायबर मिसळून 20 मिमी जाडीचा थर देऊन फिनिशिंग करणे.<br>vi) पृष्ठभागावर 300 मिमी X 300 मिमी चे छोटे चौकोन बनवणे,<br>vii) कोप-यावर राउंडेड फिनिश देणे, प्लास्टर व परापेटच्या जोडेसाठी ड्रिप मोल्ड देणे,<br>viii) 10 वर्षांची गळती विरहित हमी कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर देणे रु 500/- पाण्याची चाचणी इत्यादीसह. |

( कृपया मागे पहावे )



F/MPA NEW/LETTER
Scanned with OKEN Scanner

| ८. | वार्षिक दरकरार करणेबाबतच्या अटी व शर्ती :- |
|---|---|
| | 1. दरपत्रकावर "साऊथ होस्टेलच्या इमारतीचे डाव्या भागाचे वॉटर प्रुफिंग करणेसाठी दरपत्रके" व आपले फर्मचे नाव नमुद करण्यात यावे.<br>2. नमुद सर्व कामाचे दर देणे आवश्यक राहील व दर देतांना सर्व करांसहीत नमुद करुन द्यावे. त्यानंतर नमुद दराव्यतिरीक्त अतिरीक्त दर आकारता येणार नाही.<br>3. कार्यादेश निर्गमीत झालेनंतर दरपत्रकातील नमुद कामे पुर्ण कारणेचा कालावधी हा 15 दिवसांचा राहील.<br>4. कार्यादेश झालेनंतर दरपत्रकधारकाला दरपत्रकातील नमुद दुरुस्ती कामे करणे नाकारता येणार नाही.<br>5. पुरवठादाराने मालाचा पुरवठा विहीत मुदतीत न केल्यास त्याबाबत विलंब शुल्क म्हणुन एकुण देय रकमेच्या 5% रक्कम आकारण्यात येईल व सदरची रक्कम देयकातुन वजा करण्यात येऊन देयक अदा करण्यात येईल.<br>6. सदर दुरुस्ती कामे करणेसाठी न्यूनतम ठेकेदाराची/दरपत्रकधारकाची नियुक्ती करण्याचे अधिकार महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांना राहील.<br>7. कामाचा दर्जा समाधानकारक नसल्यास अथवा इतर कोणत्याही कारणामुळे कोणत्याही टप्यावर कार्यादेश नाकारण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांना राहतील.<br>8. दरपत्रकासोबत आवश्यक कागदपत्रे 1. आधारकॉर्ड, 2. पॅनकॉर्ड, 3. दुकानाचा परवाना, 4. वस्तु व सेवा कर (जीएसटी) नोंदणी प्रमाणपत्र या सर्वांची छायांकित प्रत बंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक राहील<br>9. पुरवठाधारकाचे देयक हे निधीच्या उपलब्धतेप्रमाणे अदा करण्यात येईल.<br>10. पुरवठाधारकाचे देयकाची रक्कम ऑनलाईन पध्दतीने थेट त्यांचे बँक खात्यामध्ये अदा करण्यात येणार असल्याने त्याकरिता बँक खात्याचा तपशिल बँक पासबुक / रद्द धनादेश (Cancel Cheque) देयकासोबत सादर करण्यात यावा.<br>11. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रं. संकीर्ण 2018/प्र.क्र.144/2018/कोषा प्रशा-5/, दि.28/09/2018 अन्वये TDS व GST कपातीची आवश्यकतेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |

**( मा. संचालक यांचे मान्यतेने )**

( डॉ. काकासाहेब डोळे )
उपसंचालक (प्रशासन),
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

प्रति,

सहायक संचालक (आय.टी.विभाग), म.पो.अ., नाशिक

२ /- उपरोक्त नमुद कामासाठी आवश्यक दरपत्रके मागविणेबाबत सदरचे प्रसिध्दी पत्रक एम.पी.ए. संकेतस्थळावर नमुद कालावधीकरीता प्रसारीत करावे.

सुचना फलक (नोटीस बोर्ड), म.पो.अ., नाशिक.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

श्री. संतोष खडके व श्री. उज्वल पाटील, पोलीस निरीक्षक, म.पो.अ., नाशिक

प्रत माहितीस्तव,

सहा. संचालक (कवायत), म.पो.अ., नाशिक



Scanned with OKEN Scanner